# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील माध्यमिक शाळेतील ग्रंथपालांना सर्व सेवांचा लाभ देण्याबाबत

**(१) १११८१ (०६-०१-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळेतील ग्रंथपाल मागील अनेक वर्षांपासून शंभर टक्के अनुदानित शाळेतील व नियमित वेतनश्रेणीतील कर्मचारी असूनही त्यांना प्रत्येक लाभापासून वंचित ठेवण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागाने अर्धवेळ ग्रंथपाल पद मंजूर केले मात्र त्या पदावरील कर्मचाऱ्यास अर्धे घरभाडे, प्रवासभत्ता व त्या अनुषंगाने पूर्णवेळ ग्रंथपालाच्या निम्मे लाभही मिळत नसल्याने सेवा करूनही सेवानिवृत्तनंतर ग्रंथपालांना बेरोजगारी तसेच अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू ग्रंथपालांना सर्व सेवांचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिपक केसरकर (२७-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे. तसेच वित्त विभागाच्या मान्यतेने प्रत्येक वेतन आयोगामध्ये सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात येते. तसेच अर्धवेळ ग्रंथपाल यांचे पद पूर्णवेळ ग्रंथपाल मध्ये उन्नयन करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून तो तपासण्यात येत आहे.

---

### यळगांव (ता.जि.बुलढाणा,) शिवरातील गट नंबर ४३८ मधील होंडाई वर्कशॉपचे निवासी झोनमध्ये विनापरवानगी बांधकाम करून रस्त्यावर अतिक्रमण व इतर अनधिकृत बाबी केल्याबाबत

**(२) १३२३१ (३०-०३-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यळगांव (ता.जि.बुलढाणा) शिवारातील गट नंबर ४३८ मधील निवासी झोनमध्ये होंडाई वर्कशॉपचे प्रशासनाची कुठलीही परवानगी न घेता बांधकाम करून, रस्त्यावरील झाडे अनधिकृतरित्या तोडल्याचे

तसेच गट नं. ४३८ मधील ९ मीटर रस्ताही बंद केला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शिवरातील अतिक्रमण करून झाडाची अनधिकृतपणे केलेली तोडणी यासह अनेक बाबींची तक्रार प्रा. विष्णूपंथ पाटील, अध्यक्ष, कला महाविद्यालय बुलढाणा यांनी तहसिलदार यांचेकडे पत्राद्वारे दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली होती,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या ४२ (अ) नुसार ग्रामीण क्षेत्रातील गावठाण व्यतिरिक्त भागाकरिता जिल्हाधिकारी हे विकास प्राधिकारी आहेत. महाराष्ट्र नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ मधील परवानगी देण्याचे जिल्हाधिकारी यांचे अधिकार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडून आदेश क्रमांक राजस्व कक्ष -७ (३)/अ.का/कावि-१२८०/२०१६ दिनांक २७/०५/२०१६ अन्वये वर्ग-१ च्या गावाकरीता संबंधित उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार यळगांव (ता.जि.बुलढाणा) या गावातील विकास / बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना आहेत. तथापि, यानुसार यळगांव (ता.जि.बुलढाणा) शिवारातील गट नंबर ४३८ मधील निवासी झोनमध्ये होंडाई वर्कशॉपचे बांधकामाकरिता उप विभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी परवानगी दिलेली नाही.

(२) होय,हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ५२ अन्वये अनधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही करणे ही बाब ग्रामपंचायतीच्या कार्यकक्षेत येते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ५३ अन्वये अतिक्रमण काढणेबाबत व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ५२ अन्वये अनधिकृत बांधकामाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या वय वाढीच्या निर्णयाविरुध्द कार्यवाही करणेबाबत

**(३) १३२६१ (१३-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरून ६२ करणेबाबत शासनाने निर्णय घेतला असून या निर्णयाच्या अनुषंगाने १९३ विशेष तज्ञ अधिकारी यांनी लाभ घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयाविरोधात मॅट तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देवून वय वाढीचा आदेश रद्द ठरविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मॅट व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अद्यापपर्यंत पालन झालेले नसून हे सर्व

अधिकारी शासनाच्या सेवेत कायम आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मॅट व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करून सदर अधिकाऱ्यांच्या जागी सेवेत उपलब्ध असलेल्या पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२६-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे,

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा तसेच महाराष्ट्र विमा सेवा मधील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयात दिनांक ३०/०५/२०१५ ते दिनांक ३१/०५/२०२१ या कालावधीतील वेगवेगळया शासन निर्णयान्वये ५८ वर्षे वरून ६० वर्षे व ६० वर्षे वरुन ६२ वर्षे अशी वाढ करण्यात आलेली होती. त्यामधील दिनांक ३०/०५/२०१५, दिनांक ३०/०६/२०१५ व दिनांक ०३/०९/२०१५ रोजीचे शासन निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात निर्णय आव्हानित करण्यात आलेले होते, जे दिनांक ३१/०५/२०१८ पर्यंत लागू होते, त्यांचा प्रभाव दिनांक ३१/०५/२०१८ अखेरीस संपुष्टात आलेला आहे.

त्यानंतर शासनाने वय वाढीबाबत दिनांक २९/०८/२०१८ रोजी मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय निर्गमित केला. त्यानंतर वय वाढीबाबत दिनांक ३१/०५/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयास मा.मंत्रिमंडळाची कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतु, मा.उच्च न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२० रोजीच्या निकालामध्ये नियमांत तरतूद नसल्याने केवळ प्रशासकीय आदेशाद्वारे सेवा निवृत्तीच्या वयात वाढ करता येणार नसल्याचे निर्देश देताना, ज्या अधिकाऱ्यांना वय वाढीचा लाभ झालेला आहे, त्यांच्या बाबतीत मा.उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार नियमांमध्ये बदल करुन सेवानिवृत्तीची वय वाढ नियमित करता येईल, ही बाब स्पष्ट झाली.

दरम्यान, मा.सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुज्ञा याचिका क्र.७५८५/२०२० प्रकरणी दिनांक २९/११/२०२१ रोजी मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश कायम ठेवले.

सेवानिवृत्तीच्या वयवाढीबाबत मा.प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये दाखल मूळ अर्ज क्र.६३९/२०२१ मध्ये प्रशासकीय न्यायाधिकरणाने मा.उच्च न्यायालयाचे आदेश कायम ठेवतांना ज्या अधिकाऱ्यांना वय वाढीचा लाभ झालेला आहे, त्याच्या बाबतीत हस्तक्षेप न करता पदोन्नतीची व सरळसेवेची रिक्त पदे त्वरेने भरण्याचा निर्णय दिनांक २०/१२/२०२१ रोजी दिला.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २०/०३/२०२० रोजीच्या निर्णयामध्ये सेवा निवृत्तीचे वय नियमात दुरुस्ती करुन वाढविता येते हे सुचित केल्याने मा. मंत्रिमंडळाने सेवानिवृत्ती नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबतचा निर्णय घेतला. त्यास अनुसरुन वित्त विभागाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मध्ये दिनांक २३/०२/२०२२ च्या अधिसूचनेन्वये केलेल्या सुधारणांनुसार सेवानिवृत्तीचे वय वाढीबाबतचे निर्णय नियमाधीन झालेले आहेत. सदर शासन अधिसुचनेनुसार दिनांक ०१/०६/२०२३ पासून आरोग्य यंत्रणेतील सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे एवढे राहणार आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २०/०३/२०२० रोजीच्या, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २९/११/२०२१ रोजीच्या त्याचबरोबर प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या दिनांक २०/१२/२०२१ रोजीच्या निर्णयानंतर आरोग्य यंत्रणेतील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्यात आलेले नाही.

विभागाने मा.उच्च न्यायालयाच्या त्याच बरोबर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अनुपालन केलेले असून, वय वाढीबाबत दिनांक २३/०२/२०२२ च्या अधिसूचनेनुसार केलेल्या नियमातील दुरुस्तीनुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकास संबंधित अधिकाऱ्यांना सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे.

(४) सेवानिवृत्तीची वय वाढ विचारात घेऊन निवृत्त झालेल्यांसह पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदांवर सन २०२१-२२ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ या संवर्गातील एकूण ३६७ अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत सुक्ष्मजीव प्रयोगशाळा सुरु करण्याबाबत

**(४) १३५०७ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे शासनामार्फत एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या सुक्ष्मजीव प्रयोगशाळेमुळे अतिदुर्गम जिल्ह्यातील रुग्णांना त्याचा लाभ मिळत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०२१ मध्ये काही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सदर प्रकल्पामधून नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, प्रकल्पातुन वगळल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांना योग्य उपचार मिळत नसल्यामुळे रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्पामधून वगळण्यासाठी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सुक्ष्मजीव प्रयोगशाळा पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०८-०३-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रयोगशाळा नागपूर येथील भारतीय आयुर्विज्ञान संस्था येथे स्थालांतरित केली असून तिथून सर्व गरजू रुग्णाला लाभ मिळत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

---

## ठाण्यातील व्यावसायिक संकुल प्रकल्प धोक्यात आल्याबाबत

**(५) १३९८४ (३०-०६-२०२२) श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात कळवा-खारेगाव पटटयात ७२ एकरांच्या विस्तीर्ण भूखंडावर 'सेंट्रल बिझनेस डिस्ट्रीक्ट' मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर विकसीत करण्याच्या शासनाचा बहुचर्चित प्रकल्प बेकायदा बांधकामांमुळे धोक्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या मालकीची ही मूळ जमीन ११० एकरांची असून शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे त्यापैकी ३८ एकर जमीन यापूर्वीच झोपड्या आणि बेकायदा चाळींनी गिळंकृत केली उर्वरित ७२ एकर संरक्षित जागेवरही गेल्या काही वर्षात बेकायदा बांधकामे उभी राहिले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय जमिनींचे फेरफार करून बेकायदा खरेदी-विक्री सुरू असल्याच्याही तक्रारी पुढे येवू लागल्या असल्याने याप्रकरणी सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा.महसूल मंत्री यांनी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर व्यावसायिक संकुलाच्या बेकायदेशिररित्या जमीन बळकाविण्याच्या प्रकाराबाबत संबंधित दोषी अधिकारी तथा विकासकांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०३-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील अंदाजे ३९.५५.६० हे. आर जमीन खारलॅन्ड ॲक्ट, १९४८ चे कलम २० अन्वये खारभूमी डॅव्हलपमेंट बोर्ड यांच्या नावे दाखल झाली होती. तदनंतर सदर जमिनीपैकी अंदाजे ३-४१.६० हे. आर व ३५-८६.४० हे. आर जमीन अनुक्रमे "महाराष्ट्र शासन" व पाटबंधारे विभागाकडे वर्ग झाली आहे. पाटबंधारे विभागाच्या नावे असलेल्या जमिनीपैकी २८२७८१.०० चौ. मी. जमीन महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन दिनांक २९/०३/२०१२ व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे आदेश दिनांक २६/०९/२०१२ अन्वये जिल्हा परिषद, महसूल विभाग, सामाजिक न्याय भवन, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत पारेषण कंपनी, ठाणे महानगरपालिका, क्रिडा विभाग अशा विविध विभागांना मागणी केलेल्या प्रयोजनाकरिता हस्तांतरीत करण्यात आली आहे.

मौजे कळवा, ता.जि.ठाणे येथील जमिनीवर ठाणे जिल्ह्यातील विविध प्रशासकीय प्रकल्प राबविण्याबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०/०१/२०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या मदतीने सदर जमिनीवर सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक चा बृहत आराखडा तयार करून घेण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

मौजे कळवा येथील पाटबंधारे विभागाच्या नावे असलेल्या जमिनीपैकी काही जमिनीवर पाटबंधारे विभागाची बांधकामे आहेत. तसेच काही जमीन सी. आर. झेड. ने बाधित आहे. पाटबंधारे विभागाची बांधकामे व सी.आर.झेड बाधित जमीन वगळता उर्वरीत ५.०० हे. आर जमीन ग्रोथ सेंटरसाठी शिल्लक

राहत असून सदर जमिनीवर ग्रोथ सेंटर विकसित करणे नियोजनाच्या दृष्टीने शक्य नाही, असे प्रमुख, नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांना दिनांक २६/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक २६/०९/२०१२ रोजीच्या आदेशानुसार विविध शासकीय विभाग/कार्यालय यांना वर्ग केलेल्या जमिनीची संबंधित विभागास आवश्यकता आहे किंवा कसे? याबाबत अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ०७/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

प्रस्तावाधीन जमिनीवरील बेकायदा बांधकामे व चाळींचे अतिक्रमण तसेच जमिनीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या फेरफाराबाबत तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ०४/०५/२०२२ व दिनांक २५/०५/२०२२ रोजी दिले असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

## नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठास युजीसीची मान्यता मिळण्याबाबत

**(६) १४४६२ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रसंत तुकडोजी पदव्युत्तर अभ्यासक्रमाला युजीसीची मान्यता नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना या राष्ट्रसंताच्या साहित्यावर एम.ए. करता येते पण आचार्य पदवी घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यासंदर्भात माहिती घेवून सदर अभ्यासक्रमाला युजीसीची मान्यता मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१४-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडून प्राप्त महितीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राजपत्रात एम.ए.पदवी समाविष्ट आहे. त्यानुसार सदर विद्यापीठात एम.ए.अंतर्गत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ३०(२)(क)(ड.) मधील तरतुदीनुसार विविध अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत.

सदरहू अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अंतर्गत आचार्य पदवी घेता येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोविड सेंटर उभारणी, साहित्य खरेदी व बोगस कोविड टेस्ट यामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(७) १४५३४ (२८-०६-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, अॅड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील : दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १७ मधील प्रश्न क्रमांक ८५४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जंबो कोविड सेंटर उभारणी, पीपीई किट, मास्क, व्हेंटिलेटर खरेदी व बोगस कोविड टेस्ट यामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची अनेक प्रकरणे विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी पत्रव्यवहार व सभागृहातील चर्चेच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून दिली असून शासनाच्या निधीचा अपहार झालेल्या या प्रकरणांची चौकशी करावी अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-११-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात कोविड काळात एन ९५ मास्क पीपीई किटच्या खरेदीत अनियमितता झाल्याबाबत व वेगवेगळया दराने खरेदी केल्याचे नमूद करुन तत्कालीन विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत शासनास पत्रव्यवहार केला होता. त्यानुषंगाने सर्व जिल्ह्यांकडून अहवाल मागविण्यात आला होता.

प्रत्येक जिल्ह्यातील कोविड टेस्ट करणाऱ्या प्रयोगशाळा / कोविड उपचारकेंद्रांचे नियमित नियमन व संनियंत्रण करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा शल्यचिकित्सक स्तरावर देण्यात आली होती. त्यानुषंगाने संनियंत्रणाची कार्यवाही करण्यात आली आहे. कोविड काळात निर्माण झालेली अत्यावश्यक / आकस्मिक परिस्थिती पाहता रुग्णांना सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी स्थानिक स्तरावर जिल्हा नियंत्रण कक्ष आणि जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस खरेदीचे अधिकार देण्यात आले होते.

सदर समिती मार्फत अनुदानाच्या विविध स्त्रोतातून उदा. आपत्ती व्यवस्थापन, स्थानिक डीपीडीसी / स्वराज्य संस्था निधी, राज्य शासनाकडील निधी, CSR इ. निधीतून उद्रेकाची स्थिती आणि निधीच्या उपलब्धतेनुसार खरेदी केलेली आहे.

सदर कालावधीत लॉकडाऊन इतर निर्बंध, आंतरराष्ट्रीय वाहतूक बंदी, अचानक रुग्ण संख्येत वाढ तर अचानक रुग्ण कमी होणे यामुळे निर्माण झालेला वैद्यकीय साधन सामुग्रीचा तुटवडा, तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना लागणाऱ्या सुरक्षेच्या संसाधनांची उपलब्धता करुन देण्याची निकड निर्माण झाली. त्यामुळे दरातील तफावतीपेक्षा संसाधनांची उपलब्धता व वेळेवर उपलब्धता महत्त्वाची होती. तसेच वेगवेगळया जिल्ह्यात खरेदी करण्यात आली असल्याने, जिल्हानिहाय दर वेगवेगळे आहेत. तसेच नियमित दरांच्या तुलनेत दरांमध्ये तफावत होती. सदर खरेदी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे करण्यात आलेली आहे.

त्यामुळे त्या-त्यावेळी असलेल्या अडचणी, प्रत्यक्ष गरज व त्यानुसार उपलब्धता करुन देण्याची प्राथमिकता तसेच रुग्ण व आरोग्य कर्मचारी यांच्या जिवित हानी टाळण्याच्या अनुषंगाने खरेदी करण्यात आलेली आहे, असे दिसून येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील मध्यप्रदेश भूमि स्वामीसंहिता ५५ (१)(सी) कायद्यान्वये मिळालेल्या जमिनीचा मालकी हक्क कायम करणेबाबत

**(८) १५१८२ (२८-१२-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील गट नं. ३६, ३५२ व ३५९ ही जमीन मालकी हक्काने कै.दौलत संपत कारोडे (पाटील) यांना मध्यप्रदेश भूमि स्वामीसंहिता या कायद्यान्वये ५५ (१) सी नुसार ३/४८/४२ या प्रकरण क्रमांकान्वये तहसिलदार यांच्या आदेशानुसार दिनांक ३० ऑगस्ट, १९४९ मध्ये देण्यात आली आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, सन १९५४ मध्ये मध्यप्रदेश शासन निर्णयानुसार कै.दौलत संपत कारोडे (पाटील) यांच्या मालकी हक्क प्राप्त जमिनी संदर्भातील मालकी हक्क कायम करण्यात आला नाही त्यामुळे संबंधित शेतकऱ्यावर अन्याय झाला असून जि.बुलढाणाचे महसूल अधिकारी यांनी विधिमंडळ सभागृहात उपस्थित करण्यात येणाऱ्या तारांकीत प्रश्नांना चुकीची माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमिनीच्या मालकी हक्काची अभिलेखात नोंद करण्यात होत असलेल्या दिरंगाईबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी,बुलढाणा यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने चौकशी केली आहे. समितीच्या शिफारशी व चौकशीनुसार उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद यांनी चुकीचे फेरफार रद्द करून चुकीची नावे सातबारा मधून कमी करून सदर जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे करण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील पांदण रस्त्याची कामे विहित वेळेत पूर्ण न झाल्याबाबत

**(९) १५९७० (२८-१२-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील मातोश्री पांदण रस्ता योजनेंतर्गत मंजूर झालेली पाणंद रस्त्याची कामे ग्रामपंचायत, पंचायत समित्या व जिल्हा स्तरावरील रोजगार हमी योजना विभाग यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे विहित वेळेत पूर्ण न झाल्यामुळे नागरीकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील मातोश्री पाणंद रस्ता योजनेंतर्गत तालुकानिहाय मंजूर झालेल्या पाणंद रस्त्याच्या कामांचा तपशिल काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पाणंद रस्त्याची कामे पावसाळ्यापूर्वी व चालू आर्थिक वर्षात पूर्ण व्हावीत यासाठी परभणी जिल्हा प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१६-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) शेत/पाणंद रस्त्याच्या एकूण १३९० कामांना शासनाकडून मंजूरी देण्यात आली असून १२७० कामांना कार्यारंभ आदेश प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६३४ कामे सुरु झाली असून ६३६ सुरु करण्यात येत आहेत.
(३) गट विकास अधिकारी व नरेगा कर्मचारी यांच्याकडून वेळोवेळी शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यात येत आहे. तसेच एन.एम.एम.एस.ॲप वापरण्याबाबत कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिध्दार्थ नगर, कल्याण पूर्व (जि.ठाणे) येथे एकात्मिक शहर विकास आराखड्यांतर्गत रस्ता विकसित करण्यासाठी बाधित झालेल्यांना न्याय देण्याबाबत

**(१०) १६४०५ (२९-१२-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिध्दार्थ नगर, कल्याण पूर्व (जि.ठाणे) येथील १७ घरे एकात्मिक शहर विकास आराखड्यांतर्गत रस्ता विकसित करण्यासाठी बाधित झाली असून २२ वर्षे झाल्यानंतरही बाधितांना न्याय मिळाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिध्दार्थ नगरातील १७ बाधित घरे सन २००० मध्ये तोडण्यात येऊनही एकात्मिक विकास आराखड्यानूसार रस्ताच झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने एकात्मिक शहर विकास आराखड्यांतर्गत कार्यवाही केलेल्या १७ घरांना बीएसयुपी योजनेच्या माध्यमातून घरे देण्याची मागणी सदर बाधितांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एकात्मिक शहर विकास आराखड्यांतर्गत बाधित झालेल्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
•सदर जागेव्यतिरिक्त इतर भागातील रस्त्याचे काम झालेले आहे.
(३) होय, हे खरे आहे.

•सदर बाधितांनी पुनर्वसनाबाबत मागणी केलेली असून, सदर बाधितांपैकी १६ बाधित पुनर्वसनास पात्र आहेत.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधील विविध विकासकामाने बाधित होणाऱ्या नागरिकांचे बीएसयुपी योजनेतील सदनिकांमध्ये पुनर्वसन करणेबाबत मंजूरीकरीता प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असता, त्यास दिनांक १२/१२/२०२२ रोजी देण्यात आलेली आहे.

•त्यानुसार सदर प्रकल्पाने बाधित झालेल्या पुनर्वसनास पात्र असलेल्या १६ बाधितांचे पुनर्वसन करण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महसूल विभागाकरिता स्वतंत्र आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(११) १६७७० (२९-१२-२०२२) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांतर्गत (उदा. कृषी, आरोग्य, पर्यटन, परिवहन, शालेय शिक्षण, महिला व बालविकास इत्यादी) आयुक्तालय/संचालनालय कार्यरत असून सदरहू आयुक्तालय/ संचालनालयाकडून संबंधित विभागातील कार्यरत कर्मचारी यांचे आस्थापना, पदोन्नती, प्रशिक्षण, संशोधन व विकास, योजना व धोरणनिर्मिती इत्यादी बाबी हाताळल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महसूल विभागाच्या अंतर्गत विभागीय आयुक्त कार्यालय कार्यरत आहेत, परंतु महसूल विभागातील कर्मचारी यांचे आस्थापनाविषयी बाबी, प्रशिक्षण, संशोधन व विकास, कौशल्य विकास, योजना व धोरण निर्मिती इत्यादी बाबी हाताळण्याकरीता स्वतंत्र आयुक्तालय/संचालनालय उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महसूल विभागाकरिता स्वतंत्र आयुक्तालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०५-०४-२०२३) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) शासनाने वेळोवेळी विभागीय आयुक्तांना प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकारांनुसार विभागीय आयुक्त कार्यालयांमार्फत त्यांच्या महसुली विभागाअंतर्गत काम करणाऱ्या महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या आस्थापना, प्रशिक्षण, संशोधन व विकास, कौशल्य विकास इत्यादी विषयक बाबी हाताळल्या जातात. महसूल विभागाकरिता स्वतंत्र आयुक्तालय स्थापन करण्याची बाब विचाराधीन नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हा कौशल्य विकास कार्यालयामध्ये कायमस्वरुपी सहायक आयुक्तांची नियुक्ती करण्याबाबत

**(१२) १७५४९ (२५-०३-२०२३) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रासाठी सहायक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पदाचा कार्यभार अन्य जिल्ह्यातील सहायक आयुक्तांकडे सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यात ट्रेनिंग प्रोव्हायडर (टीपी) व ट्रेनिंग सेंटर (टीसी) उभारण्यात समस्या उद्‌भवत असून सदर जिल्ह्यात कौशल्य विकास योजनेचा प्रसार कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हा कौशल्य विकास कार्यालयामध्ये कायमस्वरुपी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी दिनांक ४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.कौशल्यविकास मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रासाठी सहायक आयुक्तांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (२८-०४-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

दिनांक ३१/०५/२०२२ रोजी (म.पु) तत्कालिन सहायक आयुक्त श्री.शा.गि.पवार यांची उप आयुक्त, गट-अ पदावर पदोन्नती झाली त्यामुळे सदरचे पद दिनांक ३१/०५/२०२२ पासून रिक्त झाले आहे. या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती शेख, सहायक आयुक्त यांच्याकडे देण्यात आलेला होता.सदर कार्यभार सध्या श्री.ग.प्र.बिटोटे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, (गट-ब) केंद्र, रत्नागिरी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

यापुर्वी तत्कालिन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य, विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रत्नागिरी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता.आवश्यकतेप्रमाणे प्रत्यक्ष हजर राहून ते कामकाज करीत होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांशी संपर्कात राहत होते. याशिवाय कौशल्य विकास योजनेचे कामकाज करण्यासाठी सिंधुदुर्ग कार्यालयातील एका कर्मचारी व जिल्हा कौशल्य विकास समन्वयकावर या कामकाजाची स्वतंत्र जबाबदारी सोपविण्यात आली होती.

अशा प्रकारे ट्रेनिंग प्रोव्हायडर (टीपी) व ट्रेनिंग सेंटर (टीसी) यांना कुठल्याही अडचणी निर्माण झाल्या तर त्यांचे निराकरण वेळेवर करण्यात येते.

सद्य:स्थितीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण ०६ टीपी व १० टीसीची नोंदणी झालेली आहे. तसेच सद्य:स्थितीत Recommendation Letter दिलेल्या प्रशिक्षण संस्थांची संख्या २ आहे.

तसेच सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या वर्षात एकूण १६२७ उमेदवारांनी कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केले असून सन २०२२-२३ या वर्षात किमान कौशल्य विकास कार्यक्रम या योजनेमध्ये एकूण ११६० उमेदवारांच्या प्रशिक्षणाला तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.

(४) हे अंशत: खरे आहे,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दिनांक ३१/०५/२०२२ रोजी (म.पु) तत्कालिन सहायक आयुक्त श्री.शा.गि.पवार यांची उप आयुक्त, गट-अ पदावर पदोन्नती झाली त्यामुळे सदरचे पद दिनांक ३१/०५/२०२२ पासून रिक्त झाले आहे. या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती शेख, सहायक आयुक्त यांना देण्यात आला होता सध्या सदर पदाचा कार्यभार श्री.ग.प्र.बिटोटे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट-ब केंद्र, रत्नागिरी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

सहायक आयुक्त, गट-अ संवर्गातील सरळसेवेने भरावयाची २ रिक्तपदे भरण्याच्या अनुषंगाने आयुक्तालयाकडुन पाठविलेल्या प्रस्तावाचे मागणीपत्र साप्रविस पाठविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील तसेच कोकणातील सार्वजनिक बांधकाम विभागातील जेष्ठता यादी प्रकाशित करण्याबाबत

**(१३) १७५७० (२५-०३-२०२३) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच कोकणातील सार्वजनिक बांधकाम विभागातील वर्ग ‘ड’ मधील काही कर्मचाऱ्यांची पदोन्नती वर्ग ‘क’ मध्ये माहे मार्च २०२० रोजी वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदोन्नती झाल्यानंतर उर्वरीत वर्ग ‘ड’ मधील कर्मचारी ज्यांनी शालांत परीक्षा व मराठी, इंग्रजी टंकलेखन तसेच एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्यांची जेष्ठता यादी वर्षभरात शासन निर्णयानुसार प्रकाशित करायची असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वर्षे होऊन सुध्दा वर्ग ‘ड’ ची जेष्ठता यादी व पदोन्नतीने वर्ग ‘ड’ मधून वर्ग ‘क’ मध्ये आलेल्या कर्मचाऱ्यांची यादी प्रकाशित करण्यास अधीक्षक अभियंता मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी व कार्यकारी अभियंता, उत्तर सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी कार्यालयांच्या अधिकाऱ्यांकडे जेष्ठता यादी संदर्भात दोन वर्षे भेटी-गाठी घेऊन सुध्दा टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आह काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लचकरात-लवकर जेष्ठता यादी प्रकाशित करण्यात यावी व रिक्त पदे लवकर भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (२१-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे, रत्नागिरी कार्यालयातील गट-ड मधील पात्र कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठतेनुसार गट-क मध्ये माहे एप्रिल, २०२१ व मे, २०२१ मध्ये पदोन्नती देण्यात

आलेली आहे.
(२) होय, प्रत्येक संवर्गाची ज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक २१ जून, २०२१ नुसार करणे आवश्यक आहे.
(३) नाही, वर्ग-ड ची दिनांक ०१/०१/२०२१ व दिनांक ०१/०१/२०२२ रोजीची रत्नागिरी जिल्ह्यातील विभागाची एकत्रित ज्येष्ठता यादी कार्यकारी अभियंता, उत्तर रत्नागिरी यांनी अनुक्रमे दिनांक ०१/०२/२०२१ व दिनांक २८/११/२०२२ अन्वये प्रसिध्द केलेली आहे. तसेच अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी कार्यालयाची कनिष्ठ लिपिक संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२१ व दिनांक ०१/०१/२०२२ रोजीची ज्येष्ठता यादी अधीक्षक अभियंता, सा.बां. परिमंडळ, मुंबई यांचे स्तरावरुन दिनांक २८/०३/२०२३ अन्वये एकत्रितरित्या प्रसिध्द केली आहे.
(४) कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही, अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ रत्नागिरी अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये कनिष्ठ लिपिक संवर्गातील रिक्त जागांवर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही माहे फेब्रुवारी, २०२३ पासून मंडळ स्तरावरुन सुरु असून त्यासाठी विभागीय पदोन्नती समिती स्थापन करण्यात आली असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## के. जे. सोमय्या विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण करणाऱ्या प्राध्यापकावर कारवाई करण्याबाबत

**(१४) १७९०२ (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथे शिबिरासाठी गेलेल्या के.जे.सोमय्या विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना एका प्राध्यापकाने अमानुष मारहाण करून अर्धनग्न अवस्थेत कडाक्याच्या थंडीत दोन तास उभे केल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शिबिरातून परत आल्यानंतर विद्यार्थ्यांनी झालेल्या प्रकाराची तक्रार महाविद्यालयाकडे नोंदवूनही अद्यापपर्यंत संबंधित प्राध्यापकावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि के.जे.सोमय्या विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अमानुष वागणूक आणि मारहाण करणाऱ्या संबंधित दोषी प्राध्यापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. घडलेल्य घटनेबद्दल सदर प्राध्यापकाची महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाकडून चौकशी सुरु आहे, तसेच महाविद्यालयाने दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी सदर प्राध्यापकास व्यवस्थापन समितीची चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित केले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वांद्रे (सा.बां.) उपविभाग क्र. १/२ अंतर्गत दुरुस्तीचे प्रलंबित देयकांची अदायगी करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१५) १७९०८ (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीत दुरुस्तीची कामे सुरु असून पुरेशा निधीअभावी कंत्राटदारांची देयके प्रलंबित असल्याने त्याचा परिणाम कामांच्या गतीवर झाला असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे (सा.बां.) उपविभाग क्र. १/२ अंतर्गत दुरुस्तीचे देयके प्रलंबित असल्याने सदर देयकांची अदायगी करण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याची मागणी कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी यांनी दिनांक ८ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित देयकांच्या अदायगीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१९-०४-२०२३) :** (१) वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहतीत दुरुस्तीची कामे सुरु असून निधी अभावी कामांच्या गतीवर परिणाम झालेला नाही.

(२) वांद्रे (सा.बां.) उपविभाग क्र.१/२ अंतर्गत दुरुस्तीची देयके प्रलंबित असल्याने सदर देयकांची अदायगी करण्यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) अंधेरी यांनी दिनांक ८ जून, २०२२ च्या पत्रान्वये निधी उपलब्ध करण्याबाबत व दिनांक २२/१२/२०२२ च्या पत्रान्वये वांद्रे येथील वसाहतीतील कामांची देयके अदा करण्याकरिता स्वतंत्र लेखाशीर्ष अथवा अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद मंजूर करण्याबाबत मागणी केली आहे. त्यानुषंगाने नवीन लेखाशीर्ष घेण्याबाबत प्रस्ताव महालेखाकार कार्यालयाच्या मान्यतेकरिता पाठविण्यात आला आहे. महालेखाकार कार्यालयाची मान्यता घेऊन विहित मार्गाने निधी अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही या विभागामार्फत करण्याचे नियोजित आहे.

(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता शासकीय निवासी इमारतींच्या परिरक्षण व दुरुस्तीकरिता अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई कार्यालयास दिनांक ३१/०३/२०२३ अखेर शासनाकडून रुपये २५६.४८ कोटी इतका निधी वितरित करण्यातआला आहे.

(४) लागू नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाच्या पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रम घेण्याबाबत

**(१६) १७९८५ (२५-०३-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाच्या पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रम ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यापिठाने पुरवणी प्रदान कार्यक्रम अद्यापही केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण तसेच नोकरी मिळविण्यासाठी पदवी प्रमाणपत्र आवश्यक असल्यामुळे पुरवणी पदवी प्रदान कार्यक्रम त्वरित घेण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१०-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पदवी प्रदान समारंभ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३० अन्वये कोणत्याही महिन्यात आयोजित केला जातो.

(२) हे खरे नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचा पदवी प्रदान समारंभ दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी संपन्न झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत गतवर्षाची प्रश्नपत्रिका वितरीत केल्याबाबत

**(१७) १८२४८ (२५-०३-२०२३) श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक १५२७९ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या परीक्षेत कॉन्स्टिट्यूशन लॉ या विषयाचा पेपर माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेपर दरम्यान विद्यापीठाने महाविद्यालयांना गतवर्षीची प्रश्नपत्रिका पाठविल्याने परीक्षा उशिराने सुरू करण्याची वेळ महाविद्यालयांवर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू परिक्षेच्या वेळी कॉन्स्टिट्यूशन लॉ' या विषयाची गेल्या वर्षीचीच प्रश्नपत्रिका वितरीत करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठामार्फत दिनांक ११/१०/२०२२ रोजी विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्राच्या Constitutional Law या विषयाची परीक्षा घेण्यात आली होती. सकाळी ९.०० वा. संबंधित विषयाची प्रश्नपत्रिका क्र. ९३१९४ प्रणालीवर अपलोड करण्यात आली होती. परंतु, सदर प्रश्नपत्रिका गतवर्षीची असल्याचे निदर्शनास आल्यामुळे तात्काळ ९३१९४ प्रश्नपत्रिकेची लिंक बंद करण्यात आली व त्याऐवजी नविन प्रश्नपत्रिका ९६१२७ लिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली. सर्व महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका क्र.९३१९४ चे वाटप विद्यार्थ्यांमध्ये करुन नये, त्याऐवजी नवीन ९६१२७ प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वितरित करावी आणि परीक्षेचा कालावधी ११.०० ते १.०० वा ऐवजी १२.०० ते २.०० वाजेपर्यंत करण्यात यावा. अशा सूचना DEPDS यंत्रणेव्दारे विद्यापीठाकडून देण्यात आल्या होत्या. सदर परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यात आली.

(३) सदर प्रकरणी प्रश्निकाकडून विद्यापीठास्तरावर स्पष्टीकरण मागविण्यात आले व ही बाब विद्यापीठाच्या अवैध साधन चौकशी समिती पुढे ठेवण्यात आली. समितीच्या शिफारशीनुसार सदर प्रकरणी विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बँकाकडून पीक कर्जासाठी अडवणूक होत असल्याबाबत

**(१८) १८४४७ (२९-०३-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याबाबत शासनाचे आदेश असतानाही काही बँकांकडून शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना अडवणूक करण्यात येत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक कर्जाबाबत अडवणूक करणाऱ्या बँकांसंदर्भात मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना पीक कर्ज न देणाऱ्या बँकांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०४-०५-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) राज्यस्तरीय बँकर्स समितीमार्फत सन २०२२-२३ साठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक आराखड्यानुसार राज्यासाठी पीक कर्ज वाटपाचा रुपये ६१,८६६ कोटी रकमेच्या लक्षांक दिला होता.त्यापैकी एकूण ५६.८३ लाख शेतकऱ्यांना रुपये ५६,८७० कोटी (९१.९२%) इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

पीककर्ज वाटपाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना वेळोवेळी आढावा बैठका घेउन सूचना देण्यात येत आहेत. तसेच तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक उद्योगात अद्यापही कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याबाबत

**(१९) १८५२१ (२५-०३-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक उद्योगात अद्यापही कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक उद्योगातील कामगाराना किमान वेतन मिळावे, यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१६-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्ह्यातील १-२ उद्योगांमध्ये किमान वेतन मिळत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांचे कार्यालयात संबंधित कंपनी मालक व कामगार संघटना यांच्यात PMAS (व्यक्तिक व्यवस्थापन सल्ला योजना) अंतर्गत प्रकरणे चालविण्यात आली. सदर बैठकीत व्यवस्थापनास दिलेल्या निर्देशानुसार कामगारांना किमान वेतन आदा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय धोरण २०२० नुसार ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम सुरु करणेबाबत

**(२०) १८६०८ (२५-०३-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम जून, २०२३ पासून सुरु करण्याचे राज्य शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र नव्या रचनेनुसार पदवीसाठीच्या अभ्यासक्रमाचा आराखडाही प्रशासनाने अद्याप तयार केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील आराखडा तातडीने तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२१-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट गठीत केला होता. त्यांनी सादर

केलेला अहवाल शासनाने स्वीकृत केला असून अहवालातील शिफारसीनुसार मंत्रिमंडळ बैठकीतील मान्यतेनुसार विषयनिहाय उपसमित्या गठीत केल्या होत्या. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत सुरु असलेल्या ३ वर्षाच्या अभ्यासक्रमावरुन ४ वर्षाच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतराचा आराखडा, एकसमान बहुविद्याशाखीय शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा, सामान्य अध्यापशास्त्राऐवजी विधायक अध्यापनशास्त्राचा आराखडा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा यांचे अंमलबजावणीबाबत डॉ. रविंद्र कुलकर्णी, माजी प्र-कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई अध्यक्षतेखालील उपसमितीने सादर केलेल्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या असून शासन पत्र २०/१०/२०२२ अन्वये सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे, समूह विद्यापीठे यांना या शिफारसीसंदर्भात विद्यापीठाच्या विहित प्राधिकरणांची मान्यता घेऊन अंमलबजावणी करण्याबाबत कळविले आहे तसेच सदर शिफारसींच्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०६/१२/२०२२ अन्वये निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरु आहे. याशिवाय उपसमितींच्या शिफारसीच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी शासन निर्णय दिनांक २६/१२/२०२२ अन्वये सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव-१ (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.